राष्ट्रीय बांबू अभियान केंद्र पुरस्कृत योजनेकरिता आदिवासी घटक (जनजाती क्षेत्र उपयोजना) कार्यक्रमांतर्गत केंद्र व राज्य हिश्याकरिता नवीन लेखाशिर्ष (संगणक सांकेतांक क्रमांक) उघडणेबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.४३१/फ-९

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक- ०७ ऑगस्ट, २०१९

वाचा:-

१. केंद्र शासनाचे कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालयाचे आदेश क्रमांक F No.४४-३३/२०१८-NBM, दिनांक- २४.०७.२०१८
२. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक बांबूसा-२०१७/प्र.क्र.६८/फ-९, दि.२४.०८.२०१८
३. केंद्र शासनाचे कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालयाचे आदेश क्रमांक F No.४४-४३/२०१८-NBM, दिनांक- ०४.१०.२०१८
४. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१/सी/यो/NBM/प्र.क्र.२५/१३८४/२०१८-१९, दिनांक ०३.११.२०१८
५. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र बांबू विकास मंडळ, नागपूर यांचे पत्र क्र.व्यसं/मबांविमं/प्र.क्र.६४/५०१/१८-१९, दिनांक २८.१०.२०१८
६. महालेखापाल (ले.व.अ.) महाराष्ट्र-१, मुंबई यांचे पत्र क्र.सं.ख.वि./चा-१/महसूल व वन विभाग/युओआर-१६७/२०१८-१९/१०९९, दिनांक ०७.०२.२०१९
७. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.बांबूसा-२०१८/प्र.क्र.४१३/फ-९, दिनांक २८.०६.२०१९

प्रस्तावना:-

राष्ट्रीय बांबू अभियान(NBM) अंमलबजावणी करणेच्या अनुषंगाने संदर्भ क्र.१ नुसार केंद्रशासनाने महाराष्ट्र राज्यासाठी सन २०१८-१९ करिता कृती आराखडयास मंजूरी प्रदान केली आहे. राष्ट्रीय बांबू अभियान अंतर्गत केंद्र शासनाचे संदर्भ क्र. ३ तीन पत्रान्वये सर्वसाधारण घटक, अनुसूचित जाती उपयोजना आणि आदिवासी घटक (जनजाती क्षेत्र उपयोजना) मध्ये स्वतंत्रपणे केंद्र हिस्सा उपलब्ध करुन दिलेला आहे. संदर्भ क्र.७ च्या शासन निर्णयान्वये राष्ट्रीय बांबू अभियान (केंद्र पुरस्कृत योजना) या योजनेकरिता सर्वसाधारण प्रवर्गासाठी सद्या अस्तित्वात असलेल्या लेखाशिर्षाच्या नावामध्ये वित्त विभाग व महालेखापाल, नागपूर-II यांनी दिलेल्या मान्यतेनुसार सुधारणाकरण्यास मान्यता देण्यात आली आहे.

व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र बांबू विकास मंडळ, नागपूर यांनी सदर योजनेंतर्गतचे अनुदान आणि होणारा खर्च नोंद करण्याकरिता राष्ट्रीय बांबू अभियान अंतर्गत आदिवासी घटक (जनजाती क्षेत्र उपयोजना) कार्यक्रमांतर्गत केंद्र व राज्य हिश्याकरिता नवीन लेखाशिर्ष (संगणक सांकेतांक क्रमांक) उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्याचे त्यांचे संदर्भ क्र.५ च्या पत्रामध्ये नमूद केले आहे. सदरच्या प्रस्तावास संदर्भ क्र.४ अन्वये प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), म.रा.नागपूर यांनी शासन मंजूरी प्रदान करण्यास शासनास विनंती केली आहे.

त्यानुसार राष्ट्रीय बांबू अभियान अंतर्गत आदिवासी घटक (जनजाती क्षेत्र उपयोजना) कार्यक्रमांतर्गत केंद्र व राज्य हिश्याकरिता नवीन लेखाशिर्ष (संगणक सांकेतांक क्रमांक) उपलब्ध करण्याबाबतचा प्रस्ताव आदिवासी विकास विभागामार्फत वित्त विभागाच्या सहमतीसह महालेखापाल, मुंबई-I यांनी संदर्भ क्र.६ वरील दिनांक ०७.०२.२०१९ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने राष्ट्रीय बांबू अभियान अंतर्गत आदिवासी घटक (जनजाती क्षेत्र उपयोजना) कार्यक्रमांतर्गत केंद्र व राज्य हिश्याकरिता नवीन लेखाशिर्ष (संगणक सांकेतांक क्रमांक) उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

महालेखाकार (लेखा वहकदारी- I), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे संदर्भ क्रमांक ६ च्या पत्रान्वये प्राप्त मान्यता विचारात घेता, राष्ट्रीय बांबू अभियान (NBM) (केंद्र पुरस्कृत योजना) आदिवासी घटक (जनजाती क्षेत्र उपयोजना) कार्यक्रमांतर्गत केंद्र व राज्य हिश्याकरिता खालीलप्रमाणे नवीन लेखाशीर्ष (संगणक सांकेतांक क्रमांक) उघडण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

मराठी लेखाशिर्ष	इंग्रजी लेखाशिर्ष
महसूल व वन विभाग मागणी क्रमांक - टी-५ प्रधान लेखाशिर्ष :- २४०६ वनीकरण व वन्यजीवन ०१-वनीकरण ७९६-जनजाती क्षेत्र उपयोजना (०१) जनजाती क्षेत्र उपयोजना (०१)(११) राष्ट्रीय बांबू अभियान (६०% केंद्र हिस्सा) (२४०६ A५९७)	Revenue & Forest Department Demand No.T-5 M.H.2406-Forestry and Wild Life 01-Forestry 796-Tribal Area Sub Plan (01) Scheme under Tribal Area Sub Plan (01) (11)- National Bomboo Mission (60% Central Share) (2406 A597)
महसूल व वन विभाग मागणी क्रमांक - टी-५ प्रधान लेखाशिर्ष :- २४०६ वनीकरण व वन्यजीवन ०१-वनीकरण ७९६-जनजाती क्षेत्र उपयोजना (०१) जनजाती क्षेत्र उपयोजना (०१)(१२) राष्ट्रीय बांबू अभियान (४०% राज्य हिस्सा) (२४०६ A६०३)	Revenue & Forest Department Demand No. T-5 M.H.2406-Forestry and Wild Life 01-Forestry 789-Scheduled Caste Sub Plan (01) Social and Farm Forestry-Centrally Sponsored Scheme (01)(12)- National Bomboo Mission (40% State Share) (2406 A603)

सदर शासन निर्णय महालेखापाल (ले.व.अ.) महाराष्ट्र-२ नागपूर यांच्या पत्र क्र.सं.ख.वि./चा-१/ महसूल व वन विभाग/ युओआर-१६७/२०१८-१९/१०९९, दिनांक ०७.०२.२०१९ तसेच आदिवासी विकास विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.५९२/व्यय-१०, दिनांक २२.०७.२०१९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८०८१४३२१६२९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUJAY DEORAO DODAL

Digitally signed by SUJAY DEORAO DODAL
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=353112ee0fa47f9ff9bedae88f651d09fdb142df5fbce9c004f7eea06d8b9baf, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=a6a471816b9dbfd727f2e5ec4825f4678c8393d846acd1c16b8936c8b3a519c6, ou=REVENUE AND FOREST, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SUJAY DEORAO DODAL
Date: 2019.08.08 15:29:12 +05'30'

(सुजय दोडल)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रत :-

१. मा.मंत्री (वने) , मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
२. मा.राज्यमंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
३. प्रधान सचिव (वने), महसूल व वन विभाग यांचे स्वीय सहाय्यक
४. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
५. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
६. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र बांबू विकास मंडळ, नागपूर
७. महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
८. वित्त विभाग, व्यय-१० कार्यासन, मंत्रालय, मुंबई-३२.
९. नियोजन विभाग (का-१४७५), मंत्रालय, मुंबई-३२.
१०. आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
११. फ-२/ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१२. कार्यासन फ-९, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.(निवडनस्ती)